navbharat
Mega Developers

# DHARAVI COMPILED MEDIA REPORT
## 24 Apr, 2025

### Total Mention 15

| Print | Financial | Mainline | Regional | Periodical |
|---|---|---|---|---|
| 7 | N/A | 1 | 6 | N/A |

| Tv | Business | English | Hindi | Regional |
|---|---|---|---|---|
| 1 | N/A | N/A | N/A | 1 |

| Online |
|---|
| 7 |

## Print

| No | Newspaper | Headline | Edition | Pg |
|---|---|---|---|---|
| 1. | Mid Day | Legal notice served to state govt, civic chief over PAP rehabilitation plans | Mumbai | 2 |
| 2. | Lokmat | Propaganda of waste from Deonar dumping ground | Mumbai | 2 |
| 3. | Sakal | Dharavi's master plan in two days | Mumbai | 3 |
| 4. | Saamana | Dharavi master plan to be announced in two days | Mumbai | 3 |
| 5. | Maharashtra Times | Opposition to dumping site for Dharavi | Mumbai | 2 |
| 6. | Mumbai Tarun Bharat | New Dharavi pattern in the employment sector too | Mumbai | 4 |
| 7. | Dophar Ka Samana | Deonar dumping ground gifted to Adani | Mumbai | 5 |

Mid Day • 24 Apr • Dharavi

Legal notice served to state govt, civic chief over PAP rehabilitation plans

| 2 • PG | 399 • Sqcm | 909574 • AVE | 1.5M • Cir | Middle Left |
| --- | --- | --- | --- | --- |

Mumbai

**DHARAVI REDEVELOPMENT PROJECT**

# Legal notice served to state govt, civic chief over PAP rehabilitation plans

## Petitioner asks how citizens can be moved to dumping grounds when landfills haven't been closed for 15 years

**A CORRESPONDENT**
mailbag@mid-day.com

A LEGAL notice has been served to the principal secretary of the urban development and environment departments of the state government as well as to Municipal Commissioner Bhushan Gagrani over the Maharashtra government's decision to use the Mulund and Deonar dumping grounds for the rehabilitation of Dharavi who are residents ineligible for housing in the area being developed under the Dharavi Redevelopment Project.




Advocate Sagar Devre (centre), who has been opposed to the shifting of project-affected people to Mulund. **FILE PIC**

**'The dump yards aren't fit for human habitation. The BMC should develop an open space on the lines of New York's Central Park on the land currently occupied by the Mulund dumping ground'**
Sagar Devre, advocate

Advocate Sagar Devre, who served the notice on April 22, said that as per the solid waste management rules, landfills are fit for human habitation only 15 years after their closure.

The state government has decided to allot 124 acres of Deonar dumping ground land and 12 acres of the Mulund dumping ground for the rehabilitation of Dharavi residents.

Advocate Devre, who is fighting against a rehabilitation project on salt pan in the eastern suburbs, said, "As per point 31 of the Solid Waste Management Rules, the use of closed landfill sites after fifteen years of post-closure monitoring can be considered for human settlement or otherwise only after ensuring that gaseous and leachate analysis comply with specified standards."

He added, "The rules mention that the post-closure care of landfill sites shall be conducted for at least fifteen years with a long-term monitoring or care plan. They also mandate monitoring the leachate collection system and groundwater, maintaining groundwater quality in accordance with requirements and maintaining and operating the landfill gas collection system to meet required standards."

The closure of the Mulund dumping ground in its final stages and the processing of its waste will be completed by next year. After that, the BMC can take over the dumping ground land.

Spread over 24 hectares, the Mulund dumping ground came into being in 1968 and was closed in 2018. Around 66 per cent of waste processing at the site is completed.

Lokmat • 24 Apr • Dharavi

## Propaganda of waste from Deonar dumping ground

| 2 • PG | 261 • Sqcm | 260993 • AVE | 604.7K • Cir | Bottom Left |
|---|---|---|---|---|

Mumbai

मस्ट READ

# देवनार डम्पिंग ग्राउंडवरून अपप्रचाराचा कचरा

लोकमत निमित्त

राहुल रमेश शेवाळे
माजी खासदार
लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** आशियातील सर्वात मोठ्या धारावी पुनर्विकास प्रकल्पाला चर्चेत ठेवण्याचा विरोधकांनी विडाच उचलला आहे. हा प्रकल्प मार्गी लागतोय, हे वास्तव त्यांना स्वीकारता येत नाही. अनेक दशके सत्तेत बसून त्यांना जे करता आले नाही, ते महायुती सरकारने केले. यामुळे विरोधक हताश, अस्वस्थ आहेत. म्हणूनच अफवा पसरवून जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला जातोय. याचाच एक भाग म्हणून देवनार क्षेपणभूमी (डम्पिंग ग्राउंड) विषयी तथ्यहीन आरोप करून धारावीकरांच्या मनात भीती निर्माण केली जात आहे.



आधी हे लक्षात घेतले पाहिजे की धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी देऊ केलेल्या देवनार डम्पिंग ग्राउंडच्या जागेवर शासनाच्या धारावी पुनर्विकास प्रकल्प/ झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचा मालकी हक्क राहणार आहे. एक इंच जागा विकासकाला किंवा अन्य संस्थेला देता येणार नाही. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे, जोवर शास्त्रोक्त पद्धतीने देवनार डम्पिंग ग्राउंड पूर्णपणे बंद केले जाणार नाही, तोवर तेथे कोणतेही बांधकाम करण्याचे नियोजन नाही.

देवनार डम्पिंग ग्राउंड महापालिकेकडे आहे. डीआरपी/ एसआरए प्राधिकरणाचा या जागेवर कोणत्याही प्रकारचा अधिकार नाही. महत्त्वाचे म्हणजे धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी शासनाला देवनार डम्पिंग ग्राउंडची केवळ १२४ एकर जागा देण्यात येणार आहे. मात्र, भलतीच आकडेवारी जनतेला सांगून विरोधक संशय निर्माण करीत आहेत. डम्पिंग ग्राउंडवरील कचऱ्याची विल्हेवाट महापालिकेच्या वतीने लावण्यात येईल.

शास्त्रोक्त पद्धतीने डम्पिंग ग्राउंड बंद केल्यावर पर्यावरण विभाग तपासणी करील. सर्व तांत्रिक बाबी, पर्यावरणविषयक परवानग्या मिळाल्यावर या स्वच्छ रिक्त जागेचे हस्तांतरण शासनाकडे करण्यात येईल. यानंतर, बांधकामासाठी ही जागा योग्य आहे का, याची चाचपणी करण्यात येईल. ही संपूर्ण प्रक्रिया पार पडेपर्यंत तेथील पुनर्वसनाबाबत चर्चा करणे व्यर्थ आहे.

"धारावीकरांना देवनार डम्पिंग ग्राउंडमध्ये फेकणार" हा विरोधकांचा आरोप हास्यास्पद आहे. मुळात धारावीकरांचे जीवनमान उंचावण्याचा सरकारचा मानस आहे. असे असताना त्यांना राहत्या घरातून काढून डम्पिंग ग्राउंडवर नेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. जोवर हे डम्पिंग ग्राउंड बंद करून ती जागा बांधकामासाठी सुरक्षित असल्याबाबत पर्यावरण विभागासह अन्य यंत्रणा भूमिका स्पष्ट करत नाहीत, तोवर तेथे पुनर्वसनाचा विचारही करता येणार नाही.

धारावीकरांच्या विकासाला केंद्रस्थानी ठेवून सरकारने धारावी पुनर्विकास प्रकल्प हाती घेतला आहे. हा प्रकल्प मुंबईच्या पायाभूत सुविधा आणि सौंदर्यात भर घालणार, हे नक्की! या प्रकल्पामुळे केवळ धारावीच नव्हे तर मुंबईचा चेहरामोहरा बदलणार आहे.

Rahul Shewale defended the Dharavi redevelopment project, dismissing opposition claims about using Deonar Dumping Ground for resettlement. He clarified that no construction will occur until the site is scientifically closed and cleared, and only government agencies—not developers—will control the land. He emphasized improving Dharavi's living standards and Mumbai's development.

Sakal • 24 Apr • Dharavi

## Dharavi's master plan in two days

| 3 • PG | 55 • Sqcm | 36154 • AVE | 352.42K • Cir | Middle Center |
|---|---|---|---|---|

Mumbai

### धारावीचा मास्टर प्लॅन दोन दिवसांत

मुंबई, ता. २३ : आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी अशी ओळख असलेल्या धारावीचा कायापालट धारावी पुनर्विकास प्रकल्प (डीआरपी) आणि नवभारत मेगा डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड (एनएमडीपीएल) पुनर्विकासाच्या माध्यमातून केला जाणार आहे. त्याचा मास्टर प्लॅन पुढील दोन दिवसांत येणार आहे. त्यामुळे नव्या धारावीत कोणत्या ठिकाणी काय असेल, कुठे निवासी इमारती असतील, कुठे व्यवसायिक इमारती, मैदान, शाळा आदी बाबी स्पष्ट होणार आहेत.

धारावी सुमारे सहाशे एकर जागेवर पसरली असून त्याचा पुनर्विकास घडवून आणण्यासाठी सध्या डीआरपीकडून नबरिंग आणि घरोघर सर्व्हे सुरू आहे. त्यानुसार आतापर्यंत जवळपास ९४ हजार घरांना नबरिंग झाले असून ७० हजार झोपड्यांचे घरोघर सर्वेक्षण झाले असून हा सर्व्हे लवकरच पूर्ण होणार आहे. दरम्यान, पुढील दोन दिवसांत धारावीचा मास्टर प्लॅन येणार असल्याची माहिती डीआरपीचे मुख्य कार्यकारी अधिकारी एस. व्ही. आर. श्रीनिवास यांनी दिली.

Dharavi’s redevelopment master plan, led by DRP and Navbharat Mega Developers, will be revealed in two days. It will outline zones for housing, businesses, schools, and open spaces across the 600-acre area. So far, 90,000 homes and 3,000 huts have been surveyed, with the process nearing completion.

Saamana • 24 Apr • Dharavi

## Dharavi master plan to be announced in two days

| 3 • PG | 425 • Sqcm | 252286 • AVE | 910K • Cir | Middle Center |
|---|---|---|---|---|

Mumbai

### काय मिळणार, काय नाही

# धारावीचा मास्टर प्लॅन दोन दिवसांत जाहीर होणार

मुंबई, दि. २३ (प्रतिनिधी) – अदानी समूहाकडून करण्यात येणाऱ्या धारावी पुनर्विकास प्रकल्पाचा मास्टर प्लॅन एक-दोन दिवसांत जाहीर केला जाणार आहे. त्यामुळे पात्र आणि अपात्र धारावीकरांना नेमके कुठे आणि कसे वसवण्यात येणार आहे, त्यांच्यासाठी कोणकोणत्या सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत, याची माहिती धारावीकरांना मिळणार आहे, अशी माहिती धारावी पुनर्विकास प्राधिकरणाचे सीईओ एस. व्ही. आर. श्रीनिवास यांनी दिली.

मुंबईतील ६०० एकरवर पसरलेल्या धारावीचा पुनर्विकास अदानी समूहाकडून होणार आहे. धारावी पुनर्विकासाच्या नावाखाली अदानी समूह राज्य आणि मुंबई महापालिकेकडून मुंबईतील सुमारे दोन हजार एकरच्या अनेक मोक्याच्या जागा ताब्यात घेणार आहे. यात देवनार आणि मुलुंड डम्पिंग ग्राऊंडमधील शेकडो एकर जमिनीचाही समावेश आहे. मात्र प्रकल्पात कोणतीही पारदर्शकता नसल्याने अदानीच्या धारावी पुनर्विकास प्रकल्पाला धारावीकरांनी जोरदार विरोध केला असून सर्वेक्षणातही भाग घेतलेला नाही. या पार्श्वभूमीवर सरकारच्या वतीने जाहीर होणाऱ्या धारावीच्या मास्टर प्लॅनमध्ये नेमके काय आहे आणि त्याचे काय पडसाद उमटणार आहेत, हे एक-दोन दिवसांत स्पष्ट होणार आहे.

The Adani Group's Dharavi redevelopment master plan will be announced within two days, detailing land allocation for eligible and ineligible residents. Spanning over 2,000 acres, including Deonar and Mulund dumping grounds, the project faces backlash due to lack of transparency, with many Dharavi residents boycotting the survey.

Maharashtra Times • 24 Apr • Dharavi

## Opposition to dumping site for Dharavi

| 2 • PG | 610 • Sqcm | 1388084 • AVE | 1.3M • Cir | Middle Right |
| --- | --- | --- | --- | --- |


Mumbai

# 'धारावी'साठी डम्पिंगच्या जागेस विरोध

**म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई**

देवनार डम्पिंग ग्राऊंडमधील १२५ एकर जागा राज्य सरकारने धारावी पुनर्विकासासाठी देण्याचा निर्णय नुकताच घेतला. मात्र केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार बंद झालेल्या डम्पिंग ग्राउंडवर पुढील १५ वर्षे कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येत नाही. तरीही धारावी प्रकल्पासाठी डम्पिंग ग्राउंडची जागा देण्याचा घाट घातल्याने अॅड. सागर देवरे यांनी राज्य सरकार आणि मुंबई महापालिका आयुक्तांना कायदेशीर नोटीस बजावली आहे. देवनार डम्पिंग ग्राउंड धारावी प्रकल्पाला देण्याचा निर्णय त्वरित रद्द करण्याची मागणीही त्यांनी केली आहे.

**राज्य सरकार, मुंबई महापालिकेला कायदेशीर नोटीस**



मुंबईत दररोज निर्माण होणाऱ्या कचऱ्यासाठी देवनार, गोराई, कांजुरमार्ग व मुलुंड या ठिकाणी डम्पिंग ग्राऊंड उभारण्यात आले. यातील गोराई डम्पिंग ग्राऊंड बंद करण्यात आले. तर मुलुंड डम्पिंग ग्राऊंडवर नवीन कचरा टाकला जात नाही. मुंबईत सध्या दररोज सुमारे ६ हजार ५०० मेट्रिक टन कचरा तयार होतो आणि येथील ६०० मेट्रिक टन कचरा देवनारला तर उर्वरित कचरा कांजुरमार्ग येथे टाकला जातो.

मात्र, देवनार डम्पिंग ग्राऊंडमधील २३५ एकरपैकी मुंबई महापालिकेस आवश्यक असलेले क्षेत्र वगळून उर्वरित क्षेत्र धारावी पुर्नविकासासाठी हस्तांतरित करण्याची तयारीही महापालिकेने दर्शवली होती. त्यानुसार निर्णयही झाला आणि १२५ एकर जागा धारावी पुनर्विकासाला देण्याचा निर्णय पाच ते सहा महिन्यापूर्वी राज्य सरकारने घेतला. पुनर्विकासाला गती मिळावी यासाठी २४ जानेवारी २०२५ रोजी महसूल आणि वन विभागाने मुंबई महापालिका आयुक्तांना पत्र पाठवले. यामध्ये डम्पिंग ग्राऊंडवर कचरा साचलेला असून स्वच्छ भारत मिशन नियम २०१६ नुसार कचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करून जमीन रिकामी करण्याची जबाबदारी महापालिकेची असल्याचे स्पष्ट करत त्या जागेवरील कचरा हटवण्यास सांगितले आहे. मात्र या निर्णयाला विरोध होत आहे.

The state's decision to allocate 3 acres of Deonar Dumping Ground for Dharavi redevelopment faces legal opposition due to pollution board guidelines banning construction on closed dumping sites for three years. Activist Sagar Devere has issued a legal notice demanding cancellation, citing environmental and legal violations in the proposed plan.

Mumbai Tarun Bharat • 24 Apr • Dharavi

## New Dharavi pattern in the employment sector too

| 4 • PG | 160 • Sqcm | 20038 • AVE | 17.73K • Cir | Top Center |
|---|---|---|---|---|

Mumbai

# रोजगाराच्या क्षेत्रातही नवा धारावी पॅटर्न

**गायत्री श्रीगोंदेकर मुंबई, दि. २३ :**

आशियातील सगळ्यात मोठी झोपडपट्टी हे वर्षानुवर्षे चिकटलेले बिरुद, मूलभूत सुविधांसाठी दैनंदिन संघर्ष, बेताची आर्थिक स्थिती, उच्च शिक्षणाचा अभाव, रोजगाराभिमुख शिक्षणाची वानवा, अनुभवाची कमतरता या आणि अशा अनेक कारांमुळे धारावीतील उमेदवारांना बऱ्याचदा नावाजलेल्या कंपन्यांकडून नोकरीच्या संधी नाकारल्या जात होत्या. मात्र, गेल्या काही वर्षभरापासून 'धारावी सोशल मिशन'च्या (डीएसएम) माध्यमातून करण्यात आलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे हे चित्र काहीसे बदलले आहे.

'नवभारत मेगा डेव्हलपर्स' (एनएमडीपीएल)चा महत्त्वाकांक्षी उपक्रम असलेल्या 'डीएसएम'मुळे खासगी कंपन्यांचा धारावीतील उमेदवारांकडे बघण्याचा दृष्टिकोन आता बदलतो आहे. नुकताच याचा प्रत्यय धारावीतील तरुणाईला आला. दि. ८ मार्च रोजी, 'डीएसएम'ने 'महाराष्ट्र नेचर्स पार्क' येथे आतापर्यंतचा सर्वात मोठा रोजगार मेळावा आयोजित केला. हा धारावीच्या सशक्तीकरणाच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरला. १ हजार, ३०० हून अधिक उमेदवारांनी यात प्रत्यक्ष सहभाग घेतला आणि ४ हजार, ५०० पेक्षा जास्तजणांनी नोंदणी केली. 'डीएसएम'ने मागील वर्षभरात दोन मोठे रोजगार मेळावे आणि दहापेक्षा अधिक लहान रोजगार मेळावे घेतले आहेत. प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शनिवार आणि तिसऱ्या शुक्रवारी या लहान उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असते. सलून, ब्यूटी पार्लर, हॉटेल, मोबाईल रिपेअरिंग, टेक सपोर्ट यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये धारावीतील तरुण आता काम करत आहेत.

## कर्मचारीनिवडीसाठी अनेक कंपन्यांची धारावीला पसंती




### करिअरची दिशा बदलली

"मला 'आसुस इंडिया प्रायव्हेट लिमिटेड'मध्ये फ्रंट डेस्क एक्झिक्यूटिव्ह म्हणून ४.५७ लाख रुपयांची वार्षिक पगाराची नोकरी मिळाली आहे. 'धारावी सोशल मिशन'मुळे मला ही नोकरी मिळाली आणि माझ्या करिअरची दिशा बदलली. मी खूप आनंदी आहे.

– **समृद्धी सिंह पवार**, स्थानिक तरुणी

### योग्य नोकरी मिळाली

"मी 'ग्रीन मूनकेअर हेल्थकेअर'मध्ये हाऊसकीपिंग एक्झिक्यूटिव्ह म्हणून १.५ लाख पॅकेजसह नोकरी मिळाली. या रोजगार मेळाव्यामुळे मला माझे कौशल्य दाखवण्याची संधी मिळाली आणि योग्य नोकरी मिळाली आणि माझे आयुष्यदेखील सुधारले.

– **रोहित वाघे**, रहिवासी

"धारावी रोजगार मेळाव्यात भाग घेऊन आम्हाला चांगले उमेदवार मिळाले.

– **वेदप्रकाश त्रिपाठी**, स्पेक्ट्रम टॅलेंट मॅनेजमेंट

"आम्ही फक्त महिलांच्या पदासाठी उमेदवार शोधत होतो. या रोजगार मेळाव्यात अनेक चांगले उमेदवार मिळाले आहेत.

– **सोनाली नाईक**, टाटा स्टारबक्स

"ही एक सामाजिक जबाबदारी आहे आणि बँकिंग क्षेत्रातील संधींसाठी आम्ही धारावीतील अधिक उमेदवारांना संधी देण्यास इच्छुक आहोत.

– **अल्बर्ट परेरा**, बीपीओ

"दहावी-बारावी शिक्षण असलेल्या उमेदवारांना संधी दिली. यापैकी बहुतेक उमेदवार आमच्या पदांसाठी योग्य होते.

– **अजय सिंह**, स्विगी इंस्टा मार्ट

### धारावीतील नागरिकांची प्रगतीही महत्त्वाची

स्थानिक गरजांनुसार आखण्यात आलेले हे अभ्यासक्रम महिला, शाळा सोडलेले विद्यार्थी आणि नवउद्योजकांसाठी संधी निर्माण करत आहेत. धारावीचा पुनर्विकास जरी सुरू असला, तरी 'डीएसएम' हे सुनिश्चित करत आहे की, इथल्या माणसांची प्रगतीही तितकीच महत्त्वाची आहे. इथे केवळ इमारती उभ्या राहात नाहीत, तर येथील नागरिकांचे भविष्यही उज्ज्वल करत आहेत. याच प्रतिभावंत युवावर्गाला संधी उपलब्ध करून देण्याचे काम 'डीएसएम' करत आहे.

### ३००हून अधिकांना तत्काळ नोकरी

'टाटा स्टारबक्स', 'आयनॉक्स', 'स्वस्ति मायक्रोफायनान्स', 'श्रीराम फायनान्स', 'अर्बन', 'कोटक फाउंडेशन', 'रिलायन्स', 'टीमलीज', 'महिंद्रा', 'क्रिस्टल ग्रुप', 'डॉमिनोज', 'मॅकडोनल्ड्स', 'पिझ्झा हट' आदी ५२ नामांकित कंपन्यांनी रिटेल, हॉस्पिटॅलिटी, फायनान्स, लॉजिस्टिक्स, फास्टफूड चेन आणि होम सर्व्हिसेसमध्ये अनेक संधी उपलब्ध करून दिल्या. याद्वारे ३०० हून अधिक उमेदवारांना तिथेच थेट नोकरीची संधी मिळाली. यामुळे धारावीच्या क्षमतेविषयी असलेल्या चुकीच्या गृहितकांना ठोस उत्तर मिळाले आहे.

Dharavi Social Mission (DSM), led by Navbharat Mega Developers, is transforming employment in Dharavi by organizing regular job fairs. Over 3,500 youth participated in a recent fair, securing roles in retail, hospitality, and finance. DSM counters stereotypes, empowering locals—especially youth and women—with job-ready skills and meaningful opportunities.

Dophar Ka Samana • 24 Apr • Dharavi

## Deonar dumping ground gifted to Adani

| 5 • PG | 112 • Sqcm | 18422 • AVE | 198.08K • Cir | Middle Left |
| --- | --- | --- | --- | --- |

Mumbai

### केंद्रीय प्रदूषण नियंत्रण बोर्ड के नियमों की उड़ाकर धज्जियां

# अडानी को देवनार डंपिंग ग्राउंड का उपहार

## सामाजिक कार्यकर्ता ने महायुति सरकार व मनपा को भेजा कानूनी नोटिस

**सामना संवाददाता / मुंबई**

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण बोर्ड के नियमों के अनुसार, अगले १५ वर्षों तक बंद डंपिंग ग्राउंड पर कोई निर्माण नहीं किया जा सकता है, लेकिन अडानी की धारावी पुनर्विकास परियोजना के लिए देवनार डंपिंग ग्राउंड देने का फैसला किया गया है। राज्य सरकार और मनपा ने केंद्रीय प्रदूषण बोर्ड के इन नियमों की धज्जियां उड़ा दी हैं। इस संबंध में सामाजिक कार्यकर्ता एडवोकेट सागर देवरे ने राज्य सरकार और मुंबई मनपा को कानूनी नोटिस भेजा है।



अडानी समूह धारावी पुनर्विकास परियोजना की आड़ में मुंबई में खुली जमीनों को हड़पने की कोशिश कर रहा है। इसमें देवनार डंपिंग और मुलुंड डंपिंग ग्राउंड शामिल हैं। मुंबई मनपा ने हजारों करोड़ रुपए खर्च करके इस डंपिंग ग्राउंड को रहने योग्य बनाने के लिए टेंडर जारी किया है। देवनार के साथ-साथ मुलुंड डंपिंग ग्राउंड को भी इसी परियोजना के लिए चिह्नित किया जा रहा है और उसके लिए प्रक्रिया भी चल रही है, ऐसा आरोप देवरे ने लगाया है। राज्य सरकार और मुंबई मनपा आयुक्त को केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडल के नियमों का पालन करते हुए देवनार डंपिंग ग्राउंड धारावी परियोजना को देने के निर्णय को तुरंत रद्द करना चाहिए और अगले १५ वर्षों के लिए मुलुंड और देवनार डंपिंग ग्राउंड पर किसी भी तरह के निर्माण पर रोक लगानी चाहिए। साथ ही डंपिंग ग्राउंड के ५०० मीटर के क्षेत्र को बफर जोन घोषित किया जाना चाहिए और मुलुंड डंपिंग ग्राउंड पर बिल्डर द्वारा संचालित गोल्फ कोर्स की बजाय न्यूयॉर्क के सेंट्रल पार्क की तर्ज पर एक सेंट्रल पार्क बनाया जाना चाहिए, ऐसी मांग देवरे ने राज्य और मुंबई महानगरपालिका से की है।

# Channel Overview

## Business Channel

No Coverage in this segment

## Hindi Channel

No Coverage in this segment

## English Channel

No Coverage in this segment

# Channel Overview

## Regional & Others Channel

| Total Clip | Top Channel |
|---|---|
| **1** | **NDTV Marathi (1)** |

1. NDTV मराठी NDTV Marathi 1

**NDTV Marathi**
**Dharavi**




In conversation with Chief Minister of Maharashtra Devendra Fadnavis over the Dharavi Redevelopment Project. The discussion m...

News • Marathi • 06:30 AM 24 Apr, 2025

## Online Coverage

| No | Portal Name | Headline (Incorporated with URL) | Reach |
|---|---|---|---|
| 1. | Lokmat | देवनार डम्पिंग ग्राउंडवरून अपप्रचाराचा कचरा; माजी खासदार राहुल शेवाळेंचा आरोप | 42.3M |
| 2. | Mid-Day | Mumbai: Legal notice challenges government''s move to house Dharavi residents on... | 7.5M |
| 3. | Saamana | धारावीचा मास्टर प्लॅन दोन दिवसांत जाहीर होणार; काय मिळणार, काय नाही | 1.2M |
| 4. | Tendernama | देवनार, मुलुंड डम्पिंग ग्राऊंडवर धारावीचे पुनर्वसन करण्यास विरोध; सरकार, महापालि... | N/A |
| 5. | Newsbell | Maharashtra govt. faces legal notice over decision to move Dharavi residents to ... | N/A |
| 6. | origin.mid-day.com | Mumbai: Legal notice challenges government''s move to house Dharavi residents on... | N/A |
| 7. | Uttar Bharat Live | राहुल गांधी ने केंद्र सरकार पर बोला तीखा हमला, कहा देश के युवाओं का काटा जा रहा ... | N/A |